## अर्ज निशाणी क्रमांक ३८ आणि ४० खालील एकत्रीत आदेश

**(पारीत केलेला दिनांक १६.०३.२०२४)**

**०१.** वादींनी प्रस्तूत अर्ज **नि.क्र.३८** मयत प्रतिवादी क्रमांक ०२ विरुध्द दावा अवसानात निघाल्याचा आदेश रद्द करण्यासाठी आणि अर्ज **नि.क्र.४०** विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे.

**०२.** **वादींचे कथन असे आहे की,** प्रतिवादी क्रमांक ०२ प्रभू नामदेव राठोड हा दिनांक १२.११.२०२१ रोजी मयत झाला आहे. वादींना प्रतिवादी क्रमांक ०२ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी ६२५ दिवसांचा विलंब झाला आहे. म्हणून प्रतिवादी क्रमांक ०२ विरुध्द दावा अवसानात निघाला आहे.

**०३.** प्रतिवादींविरुध्द **म्हणणे नाही** असा आदेश पारीत करण्यात येतो.

**०४.** वादींतर्फे विधीज्ज्ञ **श्री. यु. बी. पाटील** यांचा युक्तिवाद ऐकला.

**०५.** दिवाणी हक्कांच्या अंमलबजावणीसाठी वादी हे मृतक प्रतिवादी क्रमांक ०२ च्या वारसांविरुध्द दावा पुढे चालवू शकतात. म्हणून वादींना मयत प्रतिवादी क्रमांक ०२ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे आणि दावा अवसानात निघाल्याचा आदेश रद्द करणे उचित आहे. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

### आदेश

**०१.** अर्ज **नि.क्र.३८** आणि **नि.क्र.४०** मंजूर करण्यात येतो.

**०२.** वादींना मयत प्रतिवादी क्रमांक ०२ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला ६२५ दिवसांचा विलंब माफ करुन प्रतिवादी क्रमांक ०२ विरुध्द दावा अवसानात निघाल्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

**०३.** वादींनी वादपत्रात दुरुस्ती करुन दुरुस्त वादपत्र द्यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Subhash Laxman Phule
Date: 2024.03.16 17:55:50 +0530

**(श्री. एस. एल. फुले.)**

**दिनांकः– १६.०३.२०२४.** **सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**

**ठिकाण – औसा.** **जिल्हा लातूर.**